सं. फौ. ख. क्र.५९/२०१८ **निशाणी क्र.१६**

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांचा जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,</u>**

नाव – रमेश अभिमान मुंडे,

वय – ३५ वर्षे, व्यवसाय – शेती

पत्ता – रा. जोडआंबा वस्ती, ता. वडवणी, जि. बीड.

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्री. ए. डी. साखरे यांचेमार्फत सरतपास दु.१.०० वा. सुरुः</u>**

**१.** घटना ही दिनांक २३.०३.२०१८ रोजी सायंकाळी ६.०० ते ६.४५ वा. दरम्यान पुसरा फाटा येथे घडली आहे. त्यावेळी मी डोंगरे वस्ती येथे ऊसतोडीत होतो. त्यावेळी माझ्या सोबत माझा भाऊ भागवत अभिमान मुंडे हे हजर होते. त्या दिवशी सायं ६.१५ वा. माझा भाऊ भागवत अभिमान मुंडे मला असे म्हणाला की, गावाला जावुन ऊसाला पाणी देवुन येतो आणि शेतकरी नामे विष्णु नागरगोजे यांची मोटार सायकल घेवुन सायं. ६.१५ वा. डोंगरे वस्ती येथुन आमचे गाव जोडआंबा येथे जाण्यासाठी निघाले होते.

**२.** सायं. ७.०० ते ७.१५ वा. मला श्रीराम मुंडे यांचा फोन आला व त्यांनी मला असे सांगितले की, भागवतचा पुसरा फाटा येथे अपघात झाला आहे. त्यांनी असे सांगितले की, ट्रॅक्टरने विरुद्ध बाजुने (Wrong Side) निष्काळजीपणाने व हलगर्जीपणाने येवुन मोटार सायकलला धडक मारली आहे. त्यानंतर मी घटनास्थळावर पोहोचलो. त्या ठिकाणी गेलो असता मला असे दिसले की, माझा भाऊ भागवत याच्या डोक्याला, पाठीला, डोळ्याला मार लागला होता. घटनास्थळावर त्यावेळ माझ्यासोबत श्रीराम मुंडे आणि पोलीस हजर होते. त्यानंतर १०० नंबर ला फोन लावुन गाडी बोलावुन घेतली आणि भागवतला वडवणी येथील सरकारी दवाखान्यात घेवुन गेलो. डॉक्टरने माझा भाऊ भागवतला तपासुन मृत घोषित केले. त्यानंतर मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर आम्ही गावाकडे जावुन अंत्यविधी केला.

**३.** त्यानंतर घटनेच्या दुस–या दिवशी दिनांक २४.०३.२०१८ रोजी पोलीस स्टेशन वडवणी येथे जावुन तक्रार दाखल केली. आता मला दि. २४.०३.२०१८ रोजी चा रिपोर्ट दाखवण्यात आला त्यावर माझी सही असून त्यातील संपूर्ण मजकूर माझ्या माहीत प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१७** देण्यात येत आहे. आता मला दि. २४.०३.२०१८ रोजी चा छापील प्रथम खबरी अहवाल दाखवण्यात आला त्यावर माझी

सही असून त्यातील संपूर्ण मजकूर माझ्या माहीत प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१८** देण्यात येत आहे. मी आरोपीला ओळखत नाही.

**सरतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. पी. एस. उजगरे यांच्यामार्फत</u>**

४. डोंगरे वस्ती ही उपळी गावाला लागुन आहे. हे म्हणणे खरे आहे की, डोंगरे वस्ती येथुन जोडआंबा वस्ती येथे येण्यासाठी उपळी फाट्यावरुन परळी–बीड महामार्गावर बीडच्या दिशेने यावे लागते.हे म्हणणे खरे आहे की, डोंगरे वस्ती ते जोडआंबा वस्ती हे अंतर अंदाजे १५–२० किमी आहे. हे म्हणणे खरे आहे की, उपळी फाटा ते पुसरा फाटा हे अंतर अंदाजे ५–७ किमी आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटना घडली त्यावेळी उपळी फाट्यावर रस्त्याच्या दोन्ही बाजुला हॉटेल अस्तित्वात होते. घटनेच्या वेळी पुसरा फाटा येथे रस्त्याच्या दोन्ही बाजुला हॉटेल अस्तित्वात होते किंवा नाही हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, पुसरा फाट्यावर त्या फाट्याच्या आसपास असणा–या सर्व गावातील लोक हजर असतात. हे म्हणणे खरे आहे की, पुसरा फाटा बीड–परळी महामार्गावर असून सदर महामार्ग रहदारीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर महामार्गाला दोन्ही बाजुला ५–५ फुटांचे पट्टे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, बीड–परळी महामार्गावरुन दोन्ही दिशेने आलेली वाहने एकाच वेळी प्रवास करु शकतात.

५. पुसरा फाट्यावरुन परळीकडे जाताना एक छोटा पुल अस्तित्वात आहे किंवा नाही हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मार्च महिन्यामध्ये साखर कारखान्याचे सिझन असल्यामुळे पुसरा फाट्यावर वाहनांची नेहमी वर्दळ असते. हे म्हणणे खरे आहे की, पुसरा फाटा ते तेलगांव या रस्त्याच्या दोन्ही बाजुला ऊसाचे पिक असते. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरणातील अपघात मी प्रत्यक्ष स्वतः पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोणत्या वाहनाने धडक दिली हे मला माहिती नाही. घटनेच्या वेळी ट्रॅक्टरचा चालक कोण होता हे मला माहिती नाही. दिनांक २४.०३.२०१८ रोजी फिर्याद दिल्यानंतर पोलीसांनी माझ्याकडे चौकशी करुन माहिती घेतली किंवा नाही हे आज रोजी मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, अपघात झाल्यामुळे नुकसान भरपाईचा दावा दाखल केलेला आहे.

**६.** हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासादरम्यान कथन केलेल्या सर्व बाबी खोट्या सांगितल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या भावाच्या गाडीला ट्रॅक्टरने धडक दिली होती हे मी खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष दिली आहे.

**दु. १.२८ वा. उलटतपास पुर्ण.**

फेरतपास नाही.

**दिनांकः– ११.११.२०२५**

| | |
|---|---|
| **समक्ष** | **श्रवणोत्तर निवेदन स्विकृत** |
| sd/– | sd/– |
| **(विष्णु द. गिते)** | **(विष्णु द. गिते)** |
| प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, |
| वडवणी, जि. बीड. | वडवणी, जि. बीड. |